


Title Code- MAHMAR-51647

दैनिक निडर निर्भिड जनसंचलन
व्यापक जनचळवळीचा प्रहरी!




संपादक : जितेंद्र कायस्थ    Mob- 9822720784    Email- jansanchlan@gmail.com

वर्ष २ रे    अंक : ६२३ . वा    रविवार    दि. १० डिसेंबर २०२३    पृष्ठ ८    किंमत ३ रुपये

# मराठा आंदोलकांवरील गुन्हे मागे घेता येणार नाही- उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस...

## गुन्हे मागे घेतले नाही तर सरकारला पश्चाताप करावा लागेल- जरांगे पाटील

**वृत्तसंस्था/मुंबई**

जालन्यातील आंतरवाली सराटी गावात १ सप्टेंबरला मराठा आरक्षणासाठी आंदोलनाला बसलेल्या आंदोलकांवर लाठीहल्ला करण्यात आला होता. या प्रकरणावरून गृहमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडून त्यांची भूमिका स्पष्ट करण्यात आली आहे. हिवाळी अधिवेशनाच्या दुसऱ्या दिवशी देवेंद्र फडणवीस यांनी या संदर्भातील लेखी उत्तर सभागृहात सादर केले आहे. तसेच, निलंबित करण्यात आलेल्या पोलिस अधिकाऱ्यांची आणि केलेल्या कारवाईची माहिती दिली. यावेळी विधानसभेत या प्रकरणाचे लेखी उत्तर सादर देवेंद्र फडणवीस म्हणाले की, या घटनेमध्ये जवळपास ५० आंदोलक जखमी झाले असून ७९ पोलीस जखमी आहेत. त्यामुळे या घटनेत सर्वाधिक पोलीस जखमी झाल्याचे स्पष्ट झाले आहे. पोलिसांनी बचावात्मक आणि वाजवी पद्धतीने बळाचा वापर केला. ज्यामुळे कोणत्याही पद्धतीने गुन्हे सरसकट मागे घेण्यास नकार दिल्याचे या लेखी उत्तराच्या माध्यमातून स्पष्ट झाले आहे. तर, सर्व बाबींची माहिती घेतल्यानंतर गुन्हे मागे घेण्याची प्रक्रिया केली जाईल, असे या लेखी निवेदनातून सांगण्यात आले आहे. देवेंद्र फडणवीस यांनी आंतरवालीतील मराठा आंदोलकांवर दाखल करण्यात आलेले गुन्हे मागे घेण्यास या लेखी उत्तराच्या माध्यमातून असमर्थता दर्शविली आहे. दरम्यान, आता देवेंद्र फडणवीसांच्या या विधानावर जरांगे पाटील यांनी नाराजी व्यक्त केली आहे. तसेच गुन्हे मागे घेतले नाही तर देवेंद्र फडणवीस यांना पुन्हा उघडे पाडू, असा इशारा त्यांनी दिला. तसेच २४ डिसेंबरपर्यंत मराठा समाजाला आरक्षण नाही मिळाले, तर तिथून पुढे सरकारला पश्चाताप करावा लागेल, असे सूचक विधान त्यांनी केले आहे. यावेळी जरांगे माध्यमांशी संवाद साधत होते. जरांगे पाटील म्हणाले, सरकार आरक्षणाचा विषय किती गांभीर्याने घेत आहे, हे माहीत नाही. पण २४ डिसेंबर पर्यंत मराठा आरक्षण मिळणार



हे शंभर टक्के सांगतो. आमच्या मुलांचे भवितव्य आमच्यासाठी महत्त्वाचे आहे. आम्ही मोठे केलेले नेते जर आमच्याविरोधात जायला लागले, तर त्यांना पायाखाली तुडवायला आम्हाला वेळ नाही लागणार. महाराष्ट्रातला मराठा काय आहे? हे त्यांना लक्षात येईल. सरकार हा विषय प्रामुख्याने का घेत नाही, याच्यावर आमचे बारकाईने लक्ष आहे. गुन्हे मागे घेण्याबाबत आम्हाला काय आश्वासन दिले, आरक्षणासाठी काय आश्वासन दिले, यावर आमचे लक्ष आहे. अशी प्रतिक्रिया मनोज जरांगे पाटील यांनी दिली.

---

## लोकसभा निवडणूक २०२४ पूर्वतयारीच्या अनुषंगाने जिल्हाधिकारी डॉ. किरण पाटील यांच्याकडून आढावा...

**जनसंचलन/बुलढाणा**

भारत निवडणूक आयोगाच्या निर्देशानुसार आगामी लोकसभा निवडणूक २०२४ च्या निवडणूक कालावधीमध्ये कामकाज करण्यासाठी जिल्हा स्तरावर नोडल अधिकारी व सहायक नोडल अधिकारी नियुक्त करण्यात आली आहेत.

निवडणूक कालावधीमध्ये करावयाच्या कामकाजाच्या अनुषंगाने जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी डॉ. किरण पाटील यांच्या अध्यक्षतेखाली आज जिल्हाधिकारी कार्यालयात पूर्वतयारी आढावा बैठक घेण्यात आली होती. या बैठकीला निवासी उपजिल्हाधिकारी सुरेश थोरात, उपजिल्हा निवडणूक अधिकारी सुहासिनी गोणेवार, उपजिल्हाधिकारी शरद पाटील, जिल्हा पुनर्वसन अधिकारी सदाशिव




शेलार, उपविभागीय अधिकारी राजेंद्र जाधव, उपप्रादेशिक परिवहन अधिकारी तसेच इतर नियुक्त नोडल अधिकारी व सहायक नोडल अधिकारी उपस्थित होते. या बैठकीला सर्व नियुक्त नोडल अधिकारी यांच्या सभेचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी नोडल अधिका-यांना सोपविण्यात आलेल्या कामकाजाबाबतच्या सूचना जिल्हाधिकारी डॉ. किरण पाटील यांनी दिल्या.

## गळफास घेवून शेतकरीपुत्राची आत्महत्या

**जनसंचलन/चिखली**

मेरा बु सततची नापिकी व -कर्जबाजारीपणामुळे ३२ वर्षीय शेतकरी पुत्राने गळफास घेवून आत्महत्या केली. ही घटना ८ डिसेंबर रोजी सकाळी अंचरवाडी येथे उघडकीस आली . अंचरवाडी येथील रामराव शिंदे यांच्याकडे अंचरवाडी शिवारात तीन एकर जमीन आहे. यावर्षी अती पावसामुळे संपूर्ण पिकाचे



अतोनात नुकसान झाले. त्यामुळे घरात पती पत्नी मध्ये शुल्लक कारणावरून वाद होवू लागला. त्यामुळे वडिलांनी मुलाला व सुनेला समजावून सागितले की यावर्षी पिक गेले तर जावू द्या आपण पुढील वर्षी कर्ज फेडू असे सांगण्यात आले मात्र सून माहेरी निघून गेली मुल-गाही सूनेला घेण्यासाठी सासुरवाडीला गेला मात्र पत्नी पती सोबत सासरी न आल्याने त्याने घरी येवून राहत्या घरात सकाळी ८.३० वाजेच्या दरम्यान गळफास घेवून आत्महत्या केली. या घटनेची माहिती सरपंच पती समाधान परिहार यांनी अंढेरा पोलीस स्टेशनला दिली. माहिती मिळताच ठाणेदार विकास पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली बिट जमादार सिध्दार्थ सोनकांबळे यांनी घटनास्थळी धाव घेवून पंचासमक्ष पंचनामा करून मर्ग दाखल केला आहे.

दैनिक जनसंचलन
निडर निर्भिड
व्यापक जनचळवळीचा प्रहरी!



# मायलेकावर अत्याचार : अमोल खबुतरेसह दोघांविरुद्ध अॅट्रॉसिटीसह विविध गुन्हे दाखल

## वंचित बहुजन युवा आघाडीने एकाच दिवसांत मिळवून दिला न्याय...

**जनसंचलन/बुलढाणा**

शेतजमीन बळकावून जातिवाचक शिवीगाळ करत वेळोवेळी त्रास दिल्याने न्याय मिळण्यासाठी आठ दिवसांपासून उपोषण सुरू केलेल्या आमखेड येथील कासाबाई गवई व मतिमंद मुलगा शिवाजी यांना वंचित बहुजन युवा आघाडीचे जिल्हाध्यक्ष सतीश पवार यांनी एकाच दिवसांत न्याय मिळवून दिला. सुस्त प्रशासन कुठलीच कारवाई करत नसल्याचे दिसताच सतीश पवार यांनी कायदेशीर मार्गाने लढा सुरू केला. जिल्हाधिकाऱ्यांशी चर्चा करून पीडित कुटुंबीयांची न्याय्य मागणी रेटून धरली. तसेच सतीश पवार यांच्यासह पदाधिकाऱ्यांनी शुक्रवारी सायंकाळीच चिखली पोलीस ठाणे गाठले. गवई मायलेकाची सत्याची बाजू ठाणेदार संग्राम पाटील यांच्या लक्षात आणून देत अमोल खबुतरेसह अन्य एकाविरुद्ध गुन्हा दाखल करवून घेण्यात आला. शुक्रवारी रात्री साडेदहा वाजता गुन्हा दाखल करण्यात आल्याच्या एफआयआरची कॉपी हाती घेतल्यानंतर दुसऱ्या दिवशी ९ डिसेंबरला सतीश पवार यांच्या हस्ते लिंबू सरबत देऊन कासाबाई गवई व मतिमंद शिवाजी गवई यांचे उपोषण सोडविण्यात आले. एकाच दिवसात काही तासांच्या घडामोडींदरम्यान न्याय मिळवून दिल्याने वृद्ध कासाबाई यांच्या डोळ्यांत अश्रू तरळले. त्यांनी वंचित बहुजन युवा आघाडीचे आभार मानले. चिखली तालुक्यातील आमखेड येथील रहिवासी मतिमंद शिवाजी गवई यांच्या मालकीची ०.७० आर शेतजमिन चिखली येथील अमोल सुरेशआप्पा खबुतरे याने बळकावली आहे. शिवाजी गवई यांच्या मतिमंदतेचा फायदा घेऊन फसवणूक करत खरेदी खत तयार करण्यात आले. तसेच या शेतात जाण्यास गवई कुटुंबीयांना मज्जाव केला. शिवाजीचे थोरले भाऊ रमेश गवई व विलास गवई तसेच आई कासाबाई यांना अमोल खबुतरेसह दोघांनी जातिवाचक शिवीगाळ केली. शेतात गाडून टाकण्याच्या धमक्या दिल्या. तसेच कासाबाई यांना अभद्र बोलून नग्न धिंड काढण्याच्या धमक्या दिल्या. १८ मे २०२२ व २८ नोव्हेंबर २०२३ रोजी शेतात हा प्रकार घडला. शेती परत मिळून दोषींवर अॅट्रॉसिटी अॅक्टनुसार गुन्हा दाखल करण्यासाठी वृद्ध कासाबाई यांनी आपला मुलगा शिवाजीला सोबत घेऊन जिल्हाधिकारी कार्यालयासमोर उपोषण सुरू केले होते. मात्र, जिल्हा प्रशासनाने त्यांच्या उपोषणाकडे ढुंकूनही पाहिले नव्हते. गुन्हे दाखल झाल्यानंतरच सोडले वंचित बहुजन युवा आघाडीचे जिल्हाध्यक्ष सतीश पवार यांनी हे प्रकरण वंचितच्या कोर्टात घेतले. मतिमंद शिवाजी गवई यांच्या वतीने त्यांचे भाऊ रमेश गवई यांना सोबत घेऊन चिखली पोलीस ठाण्यात धडक देण्यात आली. प्रकरणाचे गांभीर्य ठाणेदार संग्राम पाटील यांच्या निदर्शनास आणून दिले. तसेच झालेल्या चर्चेनुसार जिल्हाधिकारी डॉ. किरण पाटील यांनी पोलीस प्रशासनाला




न्यायोचित सूचना दिल्या होत्या. गुन्हा दाखल होईपर्यंत सतीश पवार यांच्यासह पदाधिकाऱ्यांनी पोलीस ठाणे सोडले नाही. या प्रकरणात अमोल खबुतरेसह अन्य एकाविरुद्ध भादंवि कलम २९४, ५०४, ५०६, ३४ व अनुसूचित जाती, जमाती अत्याचार प्रतिबंधक कायदा ३ (१) (आर), ३ (१) (एस) गुन्हे नोंदवण्यात आले. शेतीचे प्रकरण न्यायप्रविष्ट असल्याने न्यायालयाच्या निकालाअंती न्याय मिळेलच, असा विश्वास सतीश पवार यांनी व्यक्त केला. या प्रकरणात वृद्ध मायलेकांना न्याय मिळवून दिल्यानंतर प्रसारमाध्यमांशी बोलताना सतीश पवार म्हणाले, खबुतरे कुटुंबीयांवर यापूर्वीही अनेक गुन्हे दाखल आहेत. या कुटुंबीयांशी संबंधित अजूनही काही पीडित लोकांचे फोन आले असून, त्याही प्रकरणांना लवकरच वाचा फोडू, असे सांगतानाच यापुढे अनुसूचित जाती, जमातीमधील व आर्थिकदृष्ट्या मागास असलेल्या नागरिकांवर अन्याय, अत्याचार झाल्यास वंचित बहुजन युवा आघाडीच्या वतीने रस्त्यावर उतरून आंदोलने करण्यात येतील, असा इशाराही पवार यांनी यावेळी दिला.

# देवेंद्रजी फडणवीस यांची कार्यतत्परता पाडळी शिंदे येथील रोहित्रा चे मेंटनस लावले तात्काळ मार्गी...

**जनसंचलन/चिखली**

पाडळी येथील कृषी पंपाची डीपी(रोहित्र)याचे केबल, ऑइल,फ्यूज,रॉड हे खराब झाल्याने ते बदलण्यात यावे अशी मागणी कनिष्ठ अभियंता देऊळगाव मही यांच्या सह वरीष्ठ अधिकारी यांच्या कडे करून सुद्दा याकडे सर्वांचे दुर्लक्ष करून काम करून देण्याकडे दुर्लक्ष करून वेठीस धरले जाते होते ही बाब सामाजिक कार्यकर्ते स्वप्नील शिंदे यांनी राज्याचे कर्तव्य दक्ष उपमुख्यमंत्री तथा ऊर्जा मंत्री महोदय यांच्याकडे ८डिसेंबर रोजी सविस्तर मांडून त्यात त्यांनी केबल देऊन दुसरीकडे वापरले व आठ दिवस देणार नाही थोडे थांबा इमर्जन्सी वापरले उपलब्ध झाल्यावर देऊ कंत्राटदार गावाला गेले आहे ही कनिष्ठ अभियंता योगेश वीर यांची उत्तरे व शेतकऱ्याच्या व्यथा मांडल्यानंतर सकाळी दहा वाजता कामाला सुरुवात झाल्याचा भ्रमणध्वनी द्वारे मंगेश गावंडे नागपूर व मुख्य अभियंता अकोला महावितरण चे प्रमोद गुमडेलवार ,यांनी सामाजिक कार्यकर्ते स्वप्नील शिंदे यांना सांगितले व त्या बाबतीत रोहित्रा जवळ जाऊन खात्री करावी व सुरळीत वीज पुरवठा सर्व कामे करून सुरळीत वीज पुरवठा होईल अशी माहिती दिली त्यावर स्वप्नील शिंदे यांनी जाऊन बघितले असता महावितरण चे कर्मचारी त्या ठिकाणी उपस्थित नव्हते ही माहिती सांगताच पुन्हा त्यानीं क्रॉस चेक केले व संबंधित अधिकारी यांना तात्काळ शेतकऱ्यांच्या बांधावर जाऊन तुमच्या उपस्थित व उपस्थित रोहित्र फोटो मागणी करण्यात आली असता महावितरण चे कर्मचारी यांची रोहित्र या जवळ जाऊन फोटो काढून पाठविण्यासाठी धावपळ उडाली अखेर सामाजिक कार्यकर्ते स्वप्नील शिंदे यांनी आधिकारी



व कर्मचारी साहित्य घेऊन रोहित्र सुधारण्यासाठी आले काम प्रगती पथावर आहे हे भ्रमणध्वनी वरून सांगितल्यावर त्यानीं सांगितले की त्यानंतर सर्व कामे करून झाल्यावर सुरळीत वीज पुरवठा सुरू करून बल लावून शेतकरी वर्गांचे मोटार पपं चालु करून घ्यावे हे सांगितले त्यानंतर संबंधित मारवाडी डीपी जवळ शेतात प्रत्यक्षात अधीक्षक अभियंता कटके, कार्यकारी अभियंता चव्हाण, यांच्या उपस्थित रोहित्र याचे केबल,रॉड, ऑइल,केबल,फ्यूज बदलून वीज पुरवठा सुरळीत करण्यात आल्या त्यानंतर दुपारी उपकार्यकारी अभियंता शेटे हे सुद्दा त्या ठिकाणी उपस्थित झाले होते. सदर रोहित्र काम करते वेळी कनिष्ठ अभियंता योगेश वीर,जनमित्र नाजीम शेख,हिवाळे,चिखली चे गायकवाड व त्यांचे कर्मचारी आदींनी डिपीचे फ्यूज,रॉड,केबल,ऑइल चे काम करून वीज पुरवठा सुरळीत चालू करून दिला यावेळी सामाजिक कार्यकर्ते स्वप्नील शिंदे,सरपंच पती प्रकाश शिंदे,ग्रामसेवा सहकारी सोसायटी संचालक हिम्मतराव शिंदे,संदीप शिंदे,मनोज मोरे ,भिमराव मोरे यांच्या सह शेतकरी उपस्थित होते व शेतकरी बांधवांनी कार्यतत्पर उपमुख्यमंत्री तथा ऊर्जा मंत्री देवेंद्रजी फडणवीस यांचे आभार मानले

# खामगाव येथे बुलढाणा जिल्हास्तरीय दिव्यांगांसाठी भव्य क्रीडा स्पर्धा...

**जनसंचलन/खामगाव**

बुलढाणा जिल्हा पॅरा ओलंपिक असोसिएशन, नगरपरिषद खामगाव व विराट मल्टीपर्पज फाउंडेशन खामगाव यांच्या संयुक्त विद्यमाने दिनांक १०/डिसेंबर/२०२३ रविवार भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर नगरपरिषद मैदान खामगाव येथे बुलढाणा जिल्हास्तरीय दिव्यांगांच्या क्रीडा स्पर्धा आयोजित करण्यात आलेल्या आहे या क्रीडा स्पर्धेतील पात्र विद्यार्थ्यांची निवड चाचणी होऊन त्यांना पुढील ध्येय गाठण्याकरिता त्यास त्यांना हातभार लागेल क्रीडा क्षेत्राच्या माध्यमातून ते साध्य करणारा यशातून त्यांचे जीवनमान उंचाविण्यास हातभार लागेल या उदात्त हेतूने विराट मल्टीपर्पज फाउंडेशन या दिव्यांग संस्थेच्या वतीने बोलणारा जिल्हास्तरीय क्रीडा स्पर्धा ज्यामध्ये गोळा फेक भालाफेक थालीफेक कबड्डी १०० मीटर धावणे व तीन चाकी सायकल असे प्रकार या स्पर्धेमध्ये ठेवण्यात आलेले आहे सदरील स्पर्धेदरम्यान महाराष्ट्र शासनाचे शिवछत्रपती पुरस्कार प्राप्त माननीय श्री संदीप जी गुरव बुलढाणा जिल्ह्याचे भूषण शिवछत्रपती पुरस्कार प्राप्त अनुराधाताई सोळंके यास आंतरराष्ट्रीय चॅम्पियन जावेद चौधरी सुनील जी वानखडे व आपल्या अंधत्वावर मात करत पीएचडी प्राप्त करणारे माधवजी गोरे त्यांचा दिव्यांग गौरव पुरस्कार देऊन सत्कार करण्यात येणार आहे या दिव्यांगणच्या जिल्हास्तरीय स्पर्धेला महाराष्ट्र राज्यातील बुलढाणा जिल्ह्यातील खामगाव तालुक्यातून प्रथम सुरुवात करण्यात येत आहे या स्पर्धेचे उद्घाटक बुलढाणा जिल्हा क्रिडा अधिकारी बाळकृष्ण महानकर हे राहणार आहेत या स्पर्धेमध्ये जास्तीत जास्त जिल्ह्यातील आपल्या क्रीडा क्षेत्रातील कौशल्य दाखवून ही स्पर्धा आंतरराष्ट्रीय पॅरा ओलंपिक क्रीडा नियमावलीनुसार होणार असल्यामुळे या स्पर्धेत निवड होऊन आपला व आपल्या जिल्ह्याचा मान वाढवण्याकरिता अवश्य सहभाग घ्यावा असे संस्थेच्या वतीने अध्यक्ष मनोज नगरनाईक यांचेवतिने कळविण्यात आले आहे या स्पर्धे करता जिल्ह्यातील समस्त दिव्यांग प्रतिनिधी विविध पक्षाचे कार्यकर्ते पदाधिकारी सामाजिक कार्यकर्ते पत्रकार बांधव यांचं सहकार्य सहभाग या क्रिडा स्पर्धेला लाभलेलं आहे




*The Daily News Paper Jansanchalan printed by owner, publisher and editor Jitendra Devchand Kayastha at Sarvadnya Printers Buldhana and published at Dainik Jansanchalan Office Shivshopping Complex Buldhana. Dainik Janasanchalan printers, owners and editors do not necessarily agree with the opinions published in the issue* Court. 9822720784 Title Code-MAHMAR-51647 Email- jansanchlan@gmail.com

दैनिक निडर निर्भिड जनसंचलन
व्यापक जनचळवळीचा प्रहरी!



# जिल्ह्यातील वंचित नागरिकांनी योजनांचा लाभ घ्यावा- जिल्हाधिकारी डॉ. किरण पाटील



जनसंचलन/ बुलढाणा

विकसित भारत संकल्प यात्रेच्या माध्यमातून सर्व योजनांची माहिती गावागावात पोहचण्यास मदत होत आहे. त्यामुळे जिल्ह्यातील जास्तीत जास्त गरजू लाभार्थ्यांनी शासनाच्या विविध योजनांचा लाभ घेण्याचे आवाहन जिल्हाधिकारी डॉ. किरण पाटील यांनी केले. जिल्ह्यात विविध गावांमधून विकसित भारत संकल्प यात्रेच्या माध्यमातून शासनाच्या योजनांविषयी जनजागृती करण्यात येत आहे. संकल्प यात्रेचे जिल्ह्यातील नियोजन, यात्रेद्वारे दिले जाणारे लाभ, विविध योजनांची माहिती याव्दारे देण्यात येत असल्याचे त्यांनी सांगितले.

विकसित भारत संकल्प यात्रा कार्यक्रमात आज जिल्ह्यातील लोकप्रतिनिधी, जिल्हा प्रशासनातील अधिकारी आणि लाभार्थी सहभागी झाले. जळगाव जामोद तालुक्यातील अकोला खुर्द येथून आमदार डॉ. संजय कुटे तर खामगाव तालुक्यातील लोखंडा गावातून आमदार अँड. आकाश फुंडकर यांच्यासह जिल्हाधिकारी डॉ. किरण पाटील, जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी श्रीमती भाग्यश्री विसपुते, उपविभागीय अधिकारी समाधान वाघ, यांच्यासह प्रशासनातील अधिकारी, सरपंच आणि लोखंडा गावचे ग्रामस्थ कार्यक्रमास उपस्थित होते. आज खामगाव तालुक्यातील लोखंडा या गावामध्ये विकसित भारत संकल्प यात्रेअंतर्गत मा. प्रधानमंत्र्यांचा नागरिकांशी थेट संवाद या कार्यक्रमामध्ये जिल्हाधिकारी डॉ. पाटील यांनी भेट दिली. या कार्यक्रमांमध्ये मान्यवरांच्या हस्ते प्रधानमंत्री जन आरोग्य योजना तसेच सामाजिक अर्थसहाय्याच्या योजनेअंतर्गत मंजूर लाभ वितरण व विविध दाखल्यांचे लाभार्थ्यांना वितरण करण्यात आले.

# लहानेचं सामाजिक क्षेत्रात मोठं कार्य...

# बुलढाण्यात आज विधवा महिला परिषद

जनसंचलन/बुलढाणा

महात्मा ज्योतिबा फुले यांनी विधवासाठी कार्य केले. याला आता शंभर वर्षे उलटून गेली आहे. त्यानंतर बुलढाण्यात प्राध्यापक डी एस लहाने यांच्या संकल्पनेतून विधवा परिषद होत आहे. या परिषदेसाठी बुलढाणा नगरी सज्ज झाली आहे. सामाजिक बदलाच्या दृष्टीने ही घटना ऐतिहासिक ठरावी अशीच आहे. प्राध्यापक लहाने यांच्या या मोठ्या कार्याची दखल राज्यातील सामाजिक क्षेत्रात कार्य करणाऱ्या व्यक्तींनी घेतली असून यासाठी अनेकांनी शुभेच्छा देत सहभागी होणार असल्याचे कळविले आहे. शिवसाई परिवार व मानस फाउंडेशनने या कार्यक्रमाचे आयोजन केले आहे. शिवसाई कॉन्व्हेंट परिसर ,तुलसी नगर बुलढाणा येथे सदर परिषद आज १० डिसेंबर रोजी बारा वाजता सुरू होत आहे. माजी मंत्री डॉक्टर राजेंद्र शिंगणे, जिल्हाधिकारी किरण पाटील, जिल्हा परिषद सीईओ भाग्यश्री विसपुते यांच्यासह अनेक मान्यवर यावेळी उपस्थित राहणार आहे. परिषदेसाठी तुलसी नगर परिसरात भव्य मंडप उभारण्यात आला आहे. तसेच नियोजनासाठी विविध समित्यांचे गठन करण्यात आले आहे आज नियोजनार्थ बैठक शिवसाई येथे पार पडली यावेळी शहरातील अनेक मान्यवरांची उपस्थिती लाभली.



विधवा परिषदेची माहिती मिळताच राज्यात सामाजिक क्षेत्रात कार्य करणाऱ्या मान्यवरांनी या घटनेच कौतुक केले आहे. अनेक लेखक ,पत्रकार यांची उपस्थिती देखील राहणार आहे. यामध्ये कोल्हापूर येथे विधवांसाठी कार्य करणाऱ्या जया कुराणे ,लेखिका साधनाताई कोठारी कोल्हापूर,हातकणंगले येथील जेष्ठ पत्रकार संजय खाडे, सातारा जिल्ह्यातील हेराड ग्रामपंचायत सरपंच व विधवा प्रथा नष्ट करण्यासाठी पुढाकार ठराव घेऊन कार्य करणारे सुरगोंडा पाटील आदींनी स्वतः फोन करून उपस्थिती दर्शविली आहे. एकूणच बुलढाण्यात होणारी महिला विधवा परिषद मैलाचा दगड ठरणार आहे. या परिषदेमध्ये सहभागी होण्याचे आवाहन प्राध्यापक डी एस लहाने, पत्रकार गणेश निकम, दीपक मोरे, प्राध्यापक शाहिनाताई पठाण, सुरेश साबळे, प्राचार्य ज्योती पाटील, प्रतिभा भुतेकर, डॉ. गायत्री सावजी,अनिता कापरे,निर्मला तायडे,वैशाली तायडे,जयश्री बोराडे,अश्विनी सोनूने आदींनी केले आहे.

# परिवर्तनाची चळवळ युवकांनी खांद्यावर घ्यावी - संदीप शेळके

## मौंढाळा येथील वन बुलढाणा मिशनच्या संवाद मेळाव्याला उत्स्फूर्त प्रतिसाद...

जनसंचलन/बुलढाणा

जिल्ह्यात सिंचन, रोजगार, शिक्षण, आरोग्य, महिला सक्षमीकरण यासह इतर क्षेत्रात अजून बरेच काम करण्याची आवश्यकता आहे. राजकीय इच्छाशक्ती असल्याशिवाय ही गोष्ट शक्य नाही. याकरिता युवकांनी पुढाकार घेऊन परिवर्तनाची चळवळ खांद्यावर घ्यावी, असे आवाहन राजर्षी शाहू परिवाराचे अध्यक्ष तथा वन बुलढाणा मिशनचे संकल्पक संदीप शेळके यांनी केले. तालुक्यातील मौंढाळा येथे ९ डिसेंबर रोजी सायंकाळी वन बुलढाणा मिशनचा संवाद मेळावा आयोजित करण्यात आला होता. याप्रसंगी प्रमुख मार्गदर्शक म्हणून ते बोलत होते. मंचावर विविध क्षेत्रातील मान्यवरांची उपस्थिती होती. पुढे बोलतांना संदीप शेळके म्हणाले, अवकाळी पावसाने शेतकऱ्यांचे शेकडो कोटींचे नुकसान केले. शासनाकडून अजून पंचनामे पूर्ण झाले नाही. तर मदत कधी मिळेल. लाखोंचे शेडनेट उध्वस्त झाले. सरकारने तुटपुंजी मदत देऊन फायदा नाही. भरघोस मदत देत शेतकऱ्यांना दिलासा दिला पाहिजे. सोयाबीन, कापूस उत्पादनात घट, यलो मोझाक, पीक विमा, अवकाळी पाऊस, नैसर्गिक आपत्ती अशी एकामागून एक संकटांची मालिका



शेतकऱ्यांसमोर आहे. मात्र याकडे लक्ष देण्याऐवजी शासन सत्तेत मशगूल असल्याची टीका संदीप शेळके यांनी केली. संवाद मेळाव्यात अनिल जाधव, विठ्ठल मोरे यांनीही मार्गदर्शन केले. सुरुवातीला गावातून निघालेल्या रॅलीत मोठ्या संख्येने नागरिक सहभागी झाले. महामानवांच्या पुतळ्यांना अभिवादन करण्यात आले. जागोजागी माताभगिनींनी संदीप शेळके यांचे औक्षण केले. सभेला धाड, बोरखेड परिसरातील नागरिक उपस्थित होते. संचलन आणि आभार नितीन उबाळे यांनी मानले. जिल्ह्यातल्या लोकप्रतिनिधींनी अनेक सत्तापदे भूषवली. मात्र स्मरणात राहील असा मोठा प्रकल्प जिल्ह्यात आणता आला नाही. एखादा आणला तर तो टिकवता आला नाही. जिल्ह्यात एकही सूतगिरणी, साखर कारखाना सुरु नाही. खासगी तत्वावरील दूध संघ सुद्धा यांना उभारता आला नाही. अमूल, अमर, विकास हे बाहेरील दूध संघ जिल्ह्यातील दूध संकलित करतात. राजकीय उदासीनतेमुळे जिल्हा विकासात मागे असल्याचा घणाघात संदीप शेळके यांनी केला. पर्यटनाच्यादृष्टीने आपला जिल्हा समृध्द करता येऊ शकतो. एवढेच काय तर जिल्ह्याला पर्यटन हब म्हणून ओळख मिळवून देता येऊ शकते. जिल्ह्यातील शेगाव, नांदुरा, बुलढाणा, देऊळगाव राजा, मेहुणा राजा, गारडगाव, सैलानी या अध्यात्मिक ठिकाणाना एकमेकांशी जोडल्यास अध्यात्मिक पर्यटन होऊ शकते. लोणार, सिंदखेड राजा, अंबाबरवा, ज्ञानगंगा अभयारण्य, पलढग, वान प्रकल्प असा पर्यटन कॉरिडॉर तयार करता येऊ शकतो. करण्यासारख्या अनेक बाबी आहेत. त्यासाठी राजकीय इच्छाशक्ती हवी. जिल्ह्याच्या विकासाचा ध्यास घेऊन वन बुलढाणा मिशन ही लोकचळवळ कार्यरत असून नागरिकांनी सहभागी व्हावे, असे आवाहन संदीप शेळके यांनी केले.

# राज्याला नव्या वर्षात नवीन मुख्यमंत्री मिळेल...



वृत्तसंस्था/नागपूर

नागपुरात होणारे विधिमंडळाचे हिवाळी अधिवेशन नेहमीच वेगवेगळ्या कारणांमुळे वादळी ठरते. कधी राजकीय आरोप, प्रत्यारोपांमुळे तर कधी पक्षातील फूट यासाठी कारणीभूत ठरते. ७ डिसेंबरपासून नागपूरमध्ये अधिवेशनाला सुरुवात झाली आहे. राज्यातील सत्ताधारी-विरोधकांमध्ये वाकयुद्ध सुरू असताना राज्याचे माजी मंत्री आणि काँग्रेसचे दिग्गज नेते बाळासाहेब थोरात यांनी मोठी भविष्यवाणी केली आहे. राज्याला नव्या वर्षात नवीन मुख्यमंत्री मिळेल आणि तो महाविकास आघाडीचाच असेल, असा दावा त्यांनी माध्यमांशी बोलतांना केला आहे. ते माध्यमांशी बोलतांना संभाव्य विधानसभा निवडणुकांचाही संदर्भ ते म्हणाले, पुढील वर्षी महाविकास आघाडीचाच मुख्यमंत्री असेल, असा दावा त्यांनी केला. पुढील वर्षी मुख्यमंत्री बदलतील आणि पुढचा मुख्यमंत्री हा महाविकास आघाडीचाच असेलफ असे थोरात म्हणाले. दरम्यान, येत्या नवीन वर्षात राज्यात मोठ्या घडामोडी अपेक्षित आहेत. त्यात राज्याला नव्या वर्षात नवीन मुख्यमंत्री मिळेल, अशी जोरदार चर्चा राजकीय वर्तुळात सुरू आहे.

# २४ डिसेंबरपर्यंत मराठा आरक्षण मिळालं नाही तर सरकारवर पश्चातापाची वेळ येईल; मनोज जरांगेंचा इशारा...

वृत्तसंस्था/नांदेड

मराठा समाज एखाद्या नेत्याच्या माथ्यावर विजयाचा गुलाल लावू शकतो तसाच वेळ पडल्यावर तो गुलाल पुसूही शकतो, अशा शब्दांत मनोज जरांगे पाटील यांनी आरक्षणाच्या मुद्द्यावरुन सर्वपक्षीय नेत्यांना इशारा दिला. आमच्यासाठी आमच्या लेकरांचं हित महत्त्वाचे आहे. आम्ही मोठे केलेले नेते जर आता आमच्याविरोधात जात असतील तर आम्हाला त्यांना पायाखाली तुडवावे लागेल, असेही त्यांनी म्हटले. ते शनिवारी नांदेडमध्ये प्रसारमाध्यमांशी बोलत होते. यावेळी त्यांनी मराठा आरक्षणासाठी दिलेल्या २४ डिसेंबरच्या अल्टिमेटमचा पुनरुच्चार केला. तोपर्यंत मराठा आरक्षण मिळालं नाही तर मग मराठा समाज काय आहे, हे लक्षात येईल. हिवाळी अधिवेशनात मराठा आरक्षणासंदर्भात नेते काय भूमिका मांडत आहेत, यावर आम्ही बारकाईने लक्ष ठेवून आहोत. २४ डिसेंबरनंतर मराठा समाज काय आहे, हे आम्ही तुम्हाला दाखवून देऊ, असे मनोज जरांगे पाटील यांनी म्हटले. राज्यातील मराठा समाज एखाद्या नेत्याला गुलाल लावू शकतो तसाच वेळ आल्यावर त्याच्या अंगावर गुलाल पडणार नाही, याचीही काळजी घेऊ शकतो. आरक्षण मिळवण्याची ताकद ही पांढरे कपडे घालणाऱ्या मराठ्यांमध्ये नाही. आरक्षण मिळवण्याची ताकद सर्वसामान्य मराठ्यांमध्ये आहे, असेही मनोज जरांगे यांनी म्हटले. यावेळी मनोज जरांगे यांनी छगन भुजबळ आणि उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनाही लक्ष्य केले. देवेंद्र फडणवीस यांनी शुक्रवारी सभागृहात अंतरवाली सराटी येथे मराठा मोर्चावर झालेल्या पोलीस लाठीमारासंदर्भात एक लेखी उत्तर दिले होते. यामध्ये देवेंद्र फडणवीस यांच्याकडून अंतरवाली सराटीत आंदोलकांपेक्षा जखमी पोलिसांची संख्या जास्त असल्याचे म्हटले होते. याविषयी मनोज जरांगे यांना विचारणा केली असता त्यांनी म्हटले की, देवेंद्र फडणवीस आपलं हे वक्तव्य बदलतील. ते लवकरच त्यांच्या मूळ भूमिकेवर येतील, ही खात्री आहे. एकट्याच्या (छगन भुजबळ) दबावाखाली येऊन त्यांनी स्टेटमेंट बदललं तर त्यांना परिणामांना सामोरे जावे लागेल. देवेंद्र फडणवीस खरं बोलले नाही तर मराठे त्यांना पुन्हा उघड पाडतील. त्यांनी कोणाच्या दबावाखाली येता कामा नये. त्यांच्यासाठी मराठा समाजही गरजेचा आहे, हे त्यांनी लक्षात ठेवावे, असेही मनोज जरांगे पाटील यांनी सांगितले.काही सरकारी अधिकाऱ्यांकडून मराठा समाजातील लोकांच्या कुणबी नोंदी शोधण्यात हलगर्जीपणा होत असल्याचा आरोप मनोज जरांगे पाटील यांनी केला. नांदेडच्या कंधारमध्ये नुकतेच असे एक प्रकरण समोर आले होते. कंधारमध्ये कुणबी नोंदी असूनही सरकारी अधिकाऱ्यांनी संबंधित मराठ्यांना कुणबी प्रमाणपत्र दिले नाही. कुणबी नोंदी नसल्याचे सांगत निरंक अहवाल देण्यात आला. त्यामुळे सरकारी अधिकारीही मराठाविरोधी वागत आहेत का, अशी शंका आम्हाला येऊ लागली आहे. मोडी लिपीच्या अभ्यासकांनी याठिकाणी



२७ कुणबी नोंदी शोधल्या होत्या. तरीही शासकीय अधिकाऱ्यांनी निरंक अहवाल दिला. त्यामुळे नोंदणी अधिकारी जातीयवाद करत आहेत का? हा प्रश्न आहे. ही बाब मी मुख्यमंत्री एकनाथ शिंदेंच्या कानावर घालणार आहे. शिंदे समितीनेही सरकारी अधिकाऱ्यांकडून अपेक्षित काम होत नसल्याबद्दल नाराजी व्यक्त केली आहे. अशा सरकारी अधिकाऱ्यांना कामावरुन कमी केले पाहिजे, निलंबित केले पाहिजे, अशी मागणी मनोज जरांगे पाटील यांनी केली.

# मलिक चालत नाहीत, मग पटेलांचे काय? संजय राऊत यांचा देवेंद्र फडणवीस यांना प्रश्न...

वृत्तसंस्था/मुंबई

राष्ट्रवादीच्या अजित पवार गटाचे कार्याध्यक्ष प्रफुल पटेल यांच्यावरही नवाब मलिक यांच्यासारखेच आरोप आहेत. त्यांचेही दाऊदच्या लोकांशी व्यवहार असल्याचा तपास यंत्रणांचा दावा आहे. मग पटेल यांच्याबाबत तुमचे मत काय आहे, असा थेट प्रश्न शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे नेते संजय राऊत यांनी शुक्रवारी केला. मलिक हे दाऊदशी संबंध असल्याच्या आरोपामुळे युतीचे भाग होऊ शकत नाहीत, या देवेंद्र फडणवीस यांच्या आरोपाची खिल्ली उडवताना मग पटेलांचे काय, अशी विचारणा त्यांनी केली. नवाब मलिक यांच्यावर तुम्ही हल्ला करत आहात. पण त्याच प्रकारच्या आरोपाचा खटला प्रफुल पटेल यांच्यावरही आहे. त्यांचाही दाऊदच्या लोकांशी जमीन व्यवहार आहे. याप्रकरणी ईडीने कारवाई केली असून, पटेल यांची मालमत्ताही ईडीने जप्त केली आहे. पटेल हे तत्कालीन काँग्रेसप्रणीत सरकारमध्ये मंत्री होते. तेव्हा याच मुद्द्यावर भाजपने सोनिया गांधींना प्रश्न केला होता. मग पटेल यांच्याबाबत तुमचे मत काय आहे असा फडणवीस यांना आपला प्रश्न आहे असे राऊत म्हणाले.राष्ट्रवादीचे नेते हसन मुश्रीफ, ७० हजार कोटी रुपयांच्या सिंचन घोटाळ्याचा आरोप असलेले अजित पवार, प्रताप सरनाईक, ईडीच्या रडारवर असलेले अनेकांची नावे आहेत. नैतिकतेचा मुद्दा असेल तर तुम्ही ज्यांच्यासोबत सरकार बनवले आहे. त्या सर्व भ्रष्ट पक्षांचे लोक तुमच्यासोबत आहे. म्हणून फडणवीस यांची नवी भूमिका ढोंग वाटतेय, अशी टीका राऊत यांनी केली. ञ्सध्या नागपूरला लबाड लांडगं ढोंग करतंय बाकी सर्व सोंग करतंय असा प्रकार सुरू आहे. मलिक हे राष्ट्रवादीचे आमदार असून, त्यांच्यावरील आरोप सिद्ध व्हायचे आहेत. आरोप सिद्ध झाल्याशिवाय त्यांना आरोपी ठरवता येत नाही, असे राऊत म्हणाले. ...काय तर म्हणे सत्तेपेक्षा देश महत्वाचा असल्याची नवीन माहिती भाजपने दिली आहे. या देशातील १४० कोटी जनतेला देश महत्वाचा आहे हे माहीतच नव्हते, असा टोलाही त्यांनी लगावला.



## उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी घेतले श्रींचे दर्शन

जनसंचलन/शेगाव

उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस हे आज शेगाव दौ-यावर आले असता, त्यांनी श्री गजानन महाराज संस्थान येथे श्रींचे दर्शन घेतले. विधान परिषद सदस्य प्रसाद लाड, आमदार डॉ. संजय कुटे, आमदार अँड. आकाश फुंडकर, आमदार श्रीमती श्वेताताई महाले, जिल्हाधिकारी डॉ. किरण पाटील, मुख्य कार्यकारी अधिकारी श्रीमती भाग्यश्री विसपुते यावेळी उपस्थित होते. श्री. गजानन महाराज संस्थानचे विश्वस्त



निलकंठ पाटील यांनी त्यांचे शाल श्रीफल व महाप्रसाद देऊन स्वागत केले. संस्थानतर्फे उपमुख्यमंत्र्यांचे औक्षण करण्यात आले.

## भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना वकील संघाच्या वतीने आदरांजली...

जनसंचलन/ बुलढाणा

बुलढाणा जिल्हा वकील संघाच्या वतीने भारतरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर यांना आदरांजली अर्पण करण्यात आली. महापरिनिर्वाण निमित्त बुलढाणा येथील प्रमुख जिल्हा व सत्र न्यायालयातील वकील संघ कक्षात श्रध्दांजलीपर कार्यक्रम आयोजित करण्यात आला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी जिल्हा वकील संघाचे अध्यक्ष ऍड. विजय हिम्मतराव सावळे हे होते. याप्रसंगी घटनाकार डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करण्यात आला. यावेळी



ऍड. विजय सावळे, ऍड बी. सी. वानखेडे, ऍड. संजय बोर्डे, ऍड. विणकर यांच्यासह वकील संघाचे पदाधिकारी व सदस्य उपस्थित होते. घटनाकारांना यावेळी विनम्र अभिवादन करण्यात आले.

दैनिक निडर निर्भिड जनसंचलन व्यापक जनचळवळीचा प्रहरी!
आपल्या परिसरातील घडणाऱ्या घटना व बातम्या ९८२२७२०७८४ किंवा ९१२९५८२९५८ या व्हाट्सअप्प नंबर वर पाठवून आम्हाला सहकार्य करावे
दैनिक निडर निर्भिड जनसंचलन व्यापक जनचळवळीचा प्रहरी!
===== बातम्या तसेच जाहिरातीसाठी संपर्क =====
संपादक - जितेंद्र कायस्थ 9822720784 ऑफिस :- 9129582958

बॉक्स

जिल्हावासियांचा बुलंद आवाज

दैनिक निडर निर्भिड जनसंचलन

व्यापक जनचळवळीचा प्रहरी!

वृत्तपत्र आणि चांगली माणसं लगेच कळत नाही त्याना वाचाव लागत

जाहिरात द्या व प्रचंड प्रतिसादाचा अनुभव घ्या...



व्यवसायिक,प्रतिष्ठाने, Wanted, पाहिजेत, ऑफर, सेल इत्यादी

8x8 cm
1 Month=5000/-
15 Day=3500/-
7 Day=2000/-
Hight 8 cm
Width 8 cm

5x8 cm
1 Month=3500/-
15 Day=2200/-
7 Day=1500/-
Hight 5 cm
Width 8 cm

5x8 cm
1 Month=3500/-
15 Day=2200/-
7 Day=1500/-
Hight 5 cm
Width 23 cm

एक दिवसाची जाहिरात: वाढदिवस शुभेच्छा, उद्घाटन, शुभारंभ, समारंभ, शुभविवाह इ.

One Day
Full Page= 8000/-
1/2 Page= 5000/-

2600/-
Hight 12 cm
Width 12 cm

1800/-
Hight 8 cm
Width 10 cm

1300/-
Hight 8 cm
Width 8 cm

T&C Apply

सुचना, नावात बदल, टी.सी. किंवा कागदपत्रे हरविली आहेत तसेच जाहीर प्रकटन इत्यादी
केवळ ३५०/- रु.

- जाहिरातीचे मॅटर तयार नसल्यास डिझाईनसाठी अतिरिक्त २००/- रुपये चार्ज पडतील.
- पूर्ण रक्कम ॲडव्हान्स दिल्यास एकुण रकमेत ५ टक्के सुट
- प्रथम पानावरील जाहिरातीसाठी १० टक्के अतिरीक्त चार्ज पडेल

विशेष सूचना- आपल्या जाहिराती आमच्या सोशल मिडीया अकाऊंटला ही नि:शुल्क झळकतील

न्यायालय तसेच धर्मदाय आयुक्तांच्या जाहीर नोटीस
फक्त ५०० रुपये

अधिक माहितीसाठी संपर्क:

अजय राजगुरे-9922359674
ऑफिस नं.-9129582958
पत्ता- शिव शॉपिंग कॉम्प्लेक्स कारंजा चौक,बुलडाणा
Mail Id: jansanchlan@gmail.com